शैक्षणिक वर्ष २०१९-२० करिता औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमातील विनाअनुदानित संस्थेस संस्थेतील रिक्त जागा संस्थास्तरावर भरण्यास मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र.मान्यता-२०१९/(प्र.क्र.१६०/१९)/तांशि-५
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८ ऑगस्ट, २०१९.

वाचा :- १) संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.१०/एडीएम/पदविका/२०१९/१०३१, दिनांक २७/०८/२०१९.

प्रस्तावना :-

शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमातील विनाअनुदानित संस्थेस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली यांची मुदतवाढ व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची संलग्नता उशीरा मिळाल्याने संस्थेतील सर्व रिक्त जागा संस्थास्तरावर भरणेबाबत संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी त्यांचे उपरोक्त संदर्भाधिन पत्रान्वये शासनास प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाचे अनुषंगाने सदर संस्थेतील सर्व रिक्त जागा संस्थास्तरावर भरण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमातील विनाअनुदानित संस्थेस अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद, नवी दिल्ली यांची मुदतवाढ व महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांची संलग्नता पदविका अभ्यासक्रमाची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची तिसरी फेरी संपुष्टात आल्यानंतर प्राप्त झाल्याने **५२९५- संजय एज्युकेशन सोसायटीचे इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी, धुळे (प्रवेश क्षमता-३०)** या औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमाच्या विनाअनुदानित संस्थेस सदर संस्थेतील सर्व रिक्त जागा संस्थास्तरावर भरण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१. संस्थेने संस्थास्तरावर उमेद्वारांना प्रवेश देताना शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या शासन मान्य प्रवेश नियमावलीतील सर्व नियमांचे पालन करणे आवश्यक राहील.

२. उपलब्ध जागांवरील प्रवेश हे पारदर्शक रितीने व गुणवत्तेनुसार करणे आवश्यक राहील.

३. सदरचे प्रवेश हे संस्थास्तरावर होत असल्याने विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहु महाराज शिक्षणशुल्क प्रतीपुर्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही. याबाबत प्रवेशाच्या वेळी संस्थेकडुन विद्यार्थ्यांना जाणीव करुन देण्यात यावी.

४. सदर संस्थांचे प्रवेश हे संबंधीत सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय यांचे निरिक्षणाखाली करण्यात यावेत. तसेच संस्थांची सर्व प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल संबंधीत सहसंचालकांनी संचालक, तंत्रशिक्षण यांचेकडे सादर करणे आवश्यक राहील.

५. सदर संस्थांनी या प्रवेशाची कार्यवाही संचालक, तंत्रशिक्षण यांनी प्रवेशाकरिता ठरविलेल्या अंतिम दिनांकापुर्वी (Cut off date) करणे अनिवार्य राहील.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०८२८१५२६५५८९०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Anil Raghunath Katkar

Digitally signed by Anil Raghunath Katkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3fec0b0f5c05dc9058175992109e62d3f5719b9dfb87a96579dc30c265d67ce, serialNumber=2356d82c73e8a0c7b6da68b6511197206b94720842cda576febebf84581fc52a, cn=Anil Raghunath Katkar
Date: 2019.08.28 15:33:20 +05'30'

(अ.र. काटकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

२. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, वांद्रे (पुर्व), मुंबई,

३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक (तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत),

४. संबंधित संस्था (तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत),

५. निवड नस्ती / तांशि-५.